# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **30/06/2022**

**Brief of the work done :-**

अकरा महिन्यांपासून फरार असलेल्या घरफोडी प्रकरणातील आरोपी चोरट्यास मानोरा पोलिसांनी हिंगोली येथून अटक केली आहे.

## अखेर त्या घरफोडी चोरट्यास पोलिसांनी केले जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ तालुक्यातील चोंडी येथील आरोपी टीनावरुन घरात प्रवेश करुन चोरी केल्यानंतर अकरा महिन्या पासुन फरार झालेल्या आरोपीस अखेर मानोरा पोलिसांनी हिंगोली येथून अटक करुन पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले.

पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार फिर्यादी विजय नागोराव हळदे रा.चोंडी ह.मु.अकोला यांनी फिर्यादी दिली की दिनांक २ जुलाई रोजी आई राहत असलेल्या चोंडी येथील घरात गावांतील आरोपी याने टिनावरुन उडी मारून घरात प्रवेश केला.आणी घराचा दरवाजा लोटून लोखंडी पेटीतील असलेले २५,००० रूपये व दोन साडीची चोरी करुन लंपास झाला.अशा आशयाच्या फिर्यादी वरुन मानोरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.अकरा महिन्या पासुन पोलीसांना गुंगारा देणारा आरोपी अलग अलग शहरात बस्तान बसवीत होता.सदर प्रकरणाचा तपासा प्रभारी ठाणेदार यांनी आठ दिवसात डीबी पथकाकडे देण्यात आला.डीबी पथकाने जलद गतीने तपासा चक्रे फिरवुन गोपनीय माहिती घेऊन आरोपी पुण्यात असल्याचा अंदाज निकामी ठरला.परत दि.२८ जुन आरोपीच्या शोधार्थ हिंगोली येथे असल्याची खात्री होताच डीबी पथकाने यशस्वी सापळा रचून आरोपी गजानन खंडारे यास ताब्यात घेण्यात आले.अकरा महिन्या पासुन पोलीसांना चकमा देणारा फरार आरोपी गजानन खंडारे यांचे विरूध्द कलम ४५७,३८० भांदवी प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.सदर प्रकरणाचा तपासा पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश पांडे, प्रभारी ठाणेदार महेश कुचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक प्रमुख गणेश जाधव, मयुरेश तिवारी, बालाजी मह्ले, बन्सी चव्हाण यांनी आरोपीस जेरबंद केले.(श.प्र.)